पुढारी

# स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज उपक्रमांतर्गत नोंदणीचे आवाहन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज उपक्रमात महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीमार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी व नवसंकल्पनांना उभारी देण्यासाठी 'महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज' हा उपक्रम महाराष्ट्र शासनाकडून घेण्यात येणार आहे. उपक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी व इच्छुक विध्यार्थ्यांनी www . msins. in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. महाविद्यालयांकरिता नोंदणीची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट व विद्यार्थ्यांसाठी १५ सप्टेंबर आहे. या इनोव्हेशन चॅलेंजमध्ये तालुकास्तरावर तीन विजेत्यांना रोख बक्षिसे व जिल्हास्तरावर दहा विजेत्यांना प्रत्येकी १ लाख रुपये व राज्यस्तरीय दहा विजेत्यांना नवउद्योग सुरू करण्याकरिता प्रत्येकी ५ लाखांचे बीज भांडवल उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पुढारी

# स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शनाचे उद्या विद्यापीठात उद्घाटन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी कोर्सच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन शनिवारी भरविण्यात आले आहे.

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी ११.४५ वाजता 'स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शना'चे उद्घाटन होईल. पत्रकारिता अध्यासनात दीड महिन्यापूर्वी डॉक्युमेंटरी फोटोग्राफी सर्टिफिकेट कोर्स सुरू झाला. या कोर्सच्या विद्यार्थ्यांनी फिल्डवर जाऊन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली छायाचित्रे काढली आहेत. त्यातील निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन आहे. प्रदर्शन आठ दिवस सर्वांसाठी खुले असेल. फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांसह पत्रकार, छायाचित्रकार आणि अन्य नागरिकांनी यावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शनाचे उद्या विद्यापीठात उद्घाटन

## पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचा उपक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे सुरू असलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी या कोर्सच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन विद्यापीठात भरवण्यात येत आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शनिवार, दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी ११.४५ वाजता अध्यासन इमारतीत 'स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शना'चे उद्घाटन होणार आहे.

पत्रकारिता अध्यासनात दीड महिन्यापूर्वी डॉक्युमेंटरी फोटोग्राफी हा सर्टिफिकेट कोर्स सुरू झाला. या कोर्सच्या विद्यार्थ्यांनी फिल्डवर जाऊन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली छायाचित्रे काढली. त्यातील निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन विद्यापीठात भरवण्यात येत आहे. यासाठी फोटोग्राफीचे शिक्षक विराज चव्हाण, जयसिंग चव्हाण, अभिजित गुर्जर, अतुल शहा आदी परिश्रम घेत आहेत. हे प्रदर्शन आठ दिवस सर्वांसाठी खुले राहणार आहे. कार्यालयीन वेळेमध्ये प्रदर्शन पाहण्यासाठी फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांसह पत्रकार, छायाचित्रकार आणि अन्य नागरिकांनी यावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात हिरकणी कक्ष उभारणार

कोल्हापूर : शासन आदेशानुसार प्रत्येक सरकारी कार्यालयामध्ये हिरकणी कक्ष उभारणे सक्तीचे आहे. परंतु अनेक शासकीय कार्यालयासह शिवाजी विद्यापीठात हिरकणी कक्ष अद्याप उभारलेला नाही. यासंदर्भात अधिसभा सदस्य श्वेता परूळेकर यांच्या पाठपुराव्यामुळे विद्यापीठातील अधिविभागांमध्ये हिरकणी कक्ष उभारण्याच्या सुचना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अस्थापना विभागाला दिल्या आहेत. शिवाजी विद्यापीठातील मध्यवर्ती ठिकाणावरील काही अधिविभागात हिरकणी कक्ष येत्या पंधरा दिवसात उभारले जाणार आहेत. जेणेकरून विद्यापीठात बाळांसह येणाऱ्या स्तनदा मातांकरीता या हिरकणी कक्षाचा उपयोग होईल. विद्यापीठात बाळांसह येणाऱ्या महिलांना स्तनपान करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे विद्यापीठाने हिरकणी कक्षात सर्व सुविधाही उपलब्ध करून द्या, अशी मागणीही अधिसभा सदस्य श्वेता परूळेकर यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

पुढारी

# डॉ. नानासाहेब थोरात यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक व शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. नानासाहेब थोरात यांचे शुक्रवारी दि. १८ रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. डॉ. थोरात हे इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मेरी क्युरी फेलो असून कोव्हिडवरील लस संशोधनाची महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या चमूचे सदस्य आहेत. 'मीट द सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत त्यांचे 'आंतरविद्याशाखीय संशोधनातील संधी, उपयोजन व जागतिक संधी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. या व्याख्यानाचा विद्यार्थी, संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. एस.बी. सादळे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठ वित्त-लेखाधिकारीपदी डॉ. सुहासिनी पाटील रुजू



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारीपदावर डॉ. सुहासिनी पाटील नुकत्याच रुजू झाल्या आहेत. शासनाच्या वित्त व लेखा सेवा विभागाच्या उपसंचालक संवर्गातून त्यांची दि. ११ ऑगस्टच्या शासन आदेशाद्वारे ही नियुक्ती करण्यात आली. दि. १४ ऑगस्ट रोजी डॉ. पाटील यांनी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्याकडून पदाचा कार्यभार स्वीकारला. याआधी त्या सांगली येथील कोषागार कार्यालयात कोषागार अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तत्पूर्वी त्यांनी कोल्हापूर, सांगली येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये काम पाहिले आहे. त्यांना या विभागातील कामकाजाचा १५ वर्षांचा अनुभव आहे.

सकाळ

# विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारीपदी डॉ. सुहासिनी पाटील यांची नियुक्ती



डॉ. पाटील

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारी पदावर डॉ. सुहासिनी सरदार पाटील रुजू झाल्या आहेत. राज्य शासनाच्या वित्त व लेखा सेवा विभागाच्या उपसंचालक संवर्गातून डॉ. पाटील यांची ११ ऑगस्टच्या शासन आदेशाद्वारे शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यांनी १४ ऑगस्टला प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्याकडून पदाचा कार्यभार स्वीकारला. यापूर्वी डॉ. पाटील या सांगली येथील कोषागार कार्यालयात कोषागार अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तत्पूर्वी, त्यांनी कोल्हापूर, सांगली येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये काम पाहिले आहे. त्यांना या विभागातील कामकाजाचा १५ वर्षांचा अनुभव आहे.

तरुण भारत

# वित्त व लेखाधिकारीपदी डॉ. सुहासिनी पाटील

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व



लेखाधिकारी पदावर डॉ. सुहासिनी पाटील रुजू झाल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वित्त व लेखा सेवा विभागाच्या उपसंचालक संवर्गातून डॉ. सुहासिनी पाटील यांची ११ ऑगस्टच्या शासन आदेशाद्वारे शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्याकडून डॉ. पाटील यांनी पदभार स्विकारला. यापूर्वी डॉ. पाटील या सांगली येथील कोषागार कार्यालयात कोषागार अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तत्पूर्वी त्यांनी कोल्हापूर, सांगली येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये काम पाहिले आहे. त्यांना या विभागातील कामकाजाचा १५ वर्षांचा अनुभव आहे.

पुढारी

# सीमाभागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षणाची संधी : डॉ. कुबल

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

दूरशिक्षणाच्या माध्यमातून सीमा भागातील विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत उच्च शिक्षणाची संधी प्राप्त होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने बेळगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांकरिता प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबिरप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे खजिनदार प्रकाश मरगाळे होते. डॉ. कुबल म्हणाले, विद्यापीठ व मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती सीमाभागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध असेल. बेळगावचे माजी नगराध्यक्ष मालोजी अष्टेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सचिन भोसले, डॉ. मुफीद मुजावर व डॉ. सुशांत माने यांनी विविध अभ्यासक्रमांबद्दल व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासंबंधी मार्गदर्शन केले. याप्रसंगी खानापूर मतदारसंघाचे माजी आ. दिगंबर पाटील, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य एम. जी. पाटील आदी उपस्थित होते. डॉ.के.बी.पाटील यांनी प्रास्ताविक केले. शिवराज पाटील यांनी आभार मानले.

पुढारी

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची उद्या प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची प्रवेश परीक्षा शनिवारी सायंकाळी ४ ते ५.३० यावेळेत ऑफलाईन पद्धतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारतीत घेण्यात येणार आहे. प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. अर्ज व परीक्षा सूचना शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा अर्ज प्रक्रियेस प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. महाविद्यालय व पदव्युतर अधिविभागात ३१ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्क अर्ज भरता येणार आहेत. विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षांसाठी अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार अतिविलंब शुल्कासह ११ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहे.